FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला. प्र. वि. पहिली खबर क्र. ०४, वर्ष २०१८, दिनांक २३/०१/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम, १९८८, कलमे Sections ७, १३ (१) (ड) सह १३(२)
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार मंगळवार तारीख पासून ऑक्टोबर, वेळ २०१५ ते तारीख पर्यंत २३/०१/१८ वेळ रोजी १८.०० वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २३/०१/२०१८, वेळ १३.०० वा.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ३३/१८, तारीख २३/०१/१८ वेळ १८.३५ वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव पंचवटी बिल्डिंग ठिकाणाचे नंबर गगनच्या चौका समोर जुन्या फुटपाथवर गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name मरोळ कडून No. if any ऑलकी डील वारिसीनार, अंधेरी (पू) मुंबई Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name प्रकाश नाझरे ........ (b) वडिलांचे / पतीचे नाव बाबाजी नाझरे ........
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ५८ वर्षे ........ (d) राष्ट्रीयत्व भारतीय ..... फोन नं. ९८९७० ०९५४४
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू ........, जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ओमकार, गल्ली / सर्व्हे गोकुळधाम / नाव नं. ई/१९/३०४ फोन / मो. नं. धरोदा पॅन नं. रोहन ........ घोटसे नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव धनसोली, जवळचे प्रसिद्ध ठिकाण नवी मुंबई गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
दिलीप चंद्रसिंग राजपूत, वरिष्ठ लिपीक / व. लि. व. प्रशासन पोलीस मरोळ मुख्यालय.
मरोळ मुख्यालय, अंधेरी (पू) मुंबई रा. ठि. ब्लॉक नं. ३३८ बी एम सी कॉलनी, सं.
वाडी, संतोष नगर, गोरेगांव (पू) मुंबई.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs) 8-2016-PA3-(K) 460

फिर्याद

दि. २३/०१/२०१८.

फिर्यादि श्री. एकनाथ बगाजी सावजे, वय ५८ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त. (पो. उप.नि./म.पो.म. मुख्यालय, मरोळ, मुंबई) रा. बी. ओमकार सोसायटी, ई/३५/३०४, धरोंदा, सेक्टर-८, घणसोली, नवी मुंबई यांचा सविस्तर जबाब देणगळ्यात मराठीत टंकलिखित करण्यात आला. सदर जबाबाची स्वतंत्र कागदावर प्रिंट आऊट काढून त्यावर फिर्यादींची स्वाक्षरी घेण्यात आली. सदर नोंद गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात यावी.

समक्ष
[signature] २३/१/१८
(राजेश मयेकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

[signature]

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाही

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

रोख रक्कम रु. ६०००/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ रोख रक्कम रु. ६०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) रोख रक्कम रु. ६०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद ता. वेळी व ठिकाणी आलोसे दिलीप राजपुत /वरिष्ठ लिपीक फ्लोअर मुख्यालय, वरळी मुंबई यांनी पदाचा गैरवापर करुन शासकीय परिक्षा स्वरीज सेवानिवृत्त फिर्यादी यांचे सेवानिवृत्ती वेतन व देय असलेली इतर देयके मंजुर करुन देण्यासाठी पडताळणी दरम्यान इसमे १०,००० लाचेची मागणी केली. तडजोड अंती त्याप्रमाणे आज सापळा कारवाई दरम्यान रु. ६०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature] 23/1/18

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ राजेश मसेकर

पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग. मुंबई.

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

—फिर्याद— दिनांक— २३/०१/२०१८

श्री. एकनाथ बगाजी ताजणे, वय— ५८ वर्षे, धंदा — सेवानिवृत्त पोलीस उप निरीक्षक नेमणूक/ल विभाग—४, मरोळ सशस्त्र पोलीस दल, मरोळ, मुंबई रा.ठि. श्री ओमकार हौ.सोसा., सेक्टर—९, घरोंदा ई/१५/३०४, घनसोली, नवी मुंबई—४००७०१ मो.क्र. ९६६४००९५७७.

...

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत सन २००६ पासून राहत आहे. मी ल विभाग—४, मरोळ सशस्त्र पोलीस दल, मरोळ, मुंबई येथे पोलीस उप निरीक्षक पदावर सन २०१५ पासून कार्यरत होतो. मी दिनांक ३०/०६/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालो आहे.

मी दिनांक ३०/०६/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले नंतर माझे सेवानिवृत्ती वेतन व इत्तर भत्ते मला मिळालेले नसून फक्त जी.पी.एफ व वेलफेअरचे पैसे ल विभाग—४ कार्यालयाकडून मिळालेले आहेत. उर्वरित रक्कम व सेवानिवृत्ती वेतनाची कागदपत्रे लवकर तयार करण्यासाठी मी ल विभाग —४ येथे कार्यरत असलेले वरिष्ठ लिपीक श्री. राजपूत यांना वेळावेळी भेटत होतो. त्यांना भेटल्या नंतर ते मला वेतन निश्चिती झालेली नाही, सेवापट अजून प्राप्त झालेले नाही इत्यादी कारणे देवून सेवानिवृत्ती वेतनाची कागदपत्रे तयार करुन निवृत्ती वेतन काढण्याचे प्रक्रियेमध्ये चालढकलपणा करत होते. भेटी दरम्यान श्री. राजपूत/ वरिष्ठ लिपीक यांनी कागदपत्र तयार करण्यासाठी व सेवानिवृत्ती वेतन मंजूर करून घेण्यासाठी पैसे द्यावे लागतील अन्यथा तुमचे काम वेळेवर पुर्ण होणार नाही असे वारंवार सांगत होते.

मला श्री. राजपूत यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २३/०१/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे जावून तेथील वरिष्ठांना भेटलो. त्यांनी मला पोलीस निरीक्षक मयेकर व सहाय्यक पोलीस आयुक्त क्षिरसागर यांची भेट घालून दिली व मला माझा तक्रार अर्ज लेखी देण्यास सांगितले. ला.प्र.वि. कार्यालयात असताना श्री. राजपूत यांचे मोबाईल क्रमांक ९८२१९७०९८८ वरुन माझे मोबाईलवर श्री. राजपूत यांनी मला मिसकॉल दिला. तदनंतर वरिष्ठांचे परवानगीने मी श्री. राजपूत यांना फोन केला असता त्यांनी मला 'तुम्ही कोठे आहात व कधी भेटण्यास येणार' असे विचारता त्यांना मी ट्रेन मध्ये असून भेटण्यास येत आहे' असे सांगितले. सदरवेळी श्री. रजपूत मला म्हणाले की, 'मरोळ येथे आल्यानंतर मला फोन करा'. असे बोलून फोन बंद केला. तदनंतर मी, पो.नि.मयेकर यांना माझे स्वहस्ताक्षरात श्री. राजपूत यांचे विरुध्द तक्रार अर्ज दिला.

पोलीस निरीक्षक श्री. मयेकर साहेब यांनी मला त्यांचे कार्यालयात घेवून गेले व तेथे उपस्थित पंचांची ओळख करुन दिली व मी दिलेला अर्ज पंचांना वाचण्यास देवून त्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या व स्वत:ही सही केली. तदनंतर पंचांसमक्ष माझे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझा आवाज ध्वनिमुद्रीत केला. त्यानंतर सापळा

समक्ष
[signature] २३/०१/१८
(राजेश कृष्णा मयेकर)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई

[signature]

पथकातील अधिकारी, अंमलदार व पंच यांचेसह शासकीय वाहनाने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून मरोळ नाका येथे पोहोचलो. सदर ठिकाणी पो.नि. मयेकर यांनी श्री. रजपूत यांना भेटण्यासाठी व पडताळणी करण्यासाठी पंच श्री. सुर्यवंशी यांचे सोबत ल विभाग–४ मरोळ येथे पाठविले. तत्पुर्वी माझे शर्टाचे आतील बाजूस व्हाईस रेकॉर्ड चालू करुन लावले. त्यानंतर मी व पंच श्री. सुर्यवंशी रिक्षाने ल विभाग–४ येथे गेलो. ल विभाग–४ गेट जवळ रिक्षा थांबवून पायी चालत मी व पंच श्री. सुर्यवंशी ल विभाग–४ प्रशासकिय कार्यालयाकडे जात असताना मी माझे मोबाईलवरुन श्री. राजपूत यांचेशी संपर्क केला असता त्यांनी ते ल विभाग–४ कम्पाऊडचे आतमध्ये असलेल्या श्री. डबडे पाटील यांचे हॉटेलमध्ये असून तेथे भेटण्यास येण्यास सांगितले. त्यानुसार मी व पंच श्री. सुर्यवंशी यांचे सोबत नमुद हॉटेलमध्ये गेलो तेव्हा पंच श्री. सुर्यवंशी बाजूचे टेबलवर बसले व मी श्री. राजपूत यांचे समोर बसलो. सदर ठिकाणी कार्यालयातील इतर कर्मचारी चहा पिण्यास उपस्थित असल्याने श्री. रजपूत यांनी मला बाहेर जावून बोलू असे सांगून येथून आम्ही हॉटेलचे बाहेर आलो. तेथून चालत पुढे आल्यानंतर मी त्यांना थांबवून माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी किती आणलेत आशी विचारणा केली असता मी त्यांच्यांशी चर्चा केली. असता श्री.राजपूत यांनी मला 'लेखापालाचे ४ व बाकीच्यांना ३ व मला असे दहा एक हजार पाहिजे अशी मागणी केली. परंतू माझेकडे कमी पैसे म्हणजे रु.७,०००/–आहेत. सदर रक्कम माझा मुलगा घेवून अंधेरी स्टेशनला आला आहे. थोडया वेळात तो येत आहे. माझे मुलगा पैसे घेवनू येतास मी तुम्हाला फोन करतो असे सांगितल्या नंतर मला फोन करा असे सांगून श्री. राजपूत हे त्यांचे कार्यालयात निघून गेले. त्यानंतर मी व पंच ल विभाग–४ कंम्पाऊडचे बाहेर येवून पुन्हा रिक्षा पकडून जेथे पोलीस पथक गाडीसह थांबविले होते त्या ठिकाणी आलो. तेथे पो.नि. मयेकर यांनी माझे शर्टाचे आत मध्ये लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढला व बंद करुन पुन्हा पंचांचे समक्ष चालू करुन संभाषण ऐकले.

श्री. राजपूत यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने श्री. मयेकर साहेब यांचे सुचनेनुसार मी माझेकडील रु.७०००/–(रु.५०० च्या १४ नोटा) पो.नि. मयेकर यांचेकडे दिल्या असता त्यांनी जवळच्या झेरॉक्स सेंन्टरवर नमुद नोटांच्या झेरॉक्स पथकातील अंमलदारामार्फत काढल्या. सदर झेरॉक्स पेपरवर उपस्थित पंचांच्या सहया घेतल्या तसेच पोनि मयेकर यांनी देखील स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि मयेकर यांनी रु. ७०००/– (रु.५००/–दराच्या १४ भारतीय चलनी नोटा) पोलीस वाहनावरील पोलीस नाईक चालक क्र.९७०८६८/भोसले यांचेमार्फत पंचासमक्ष अॅथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली व त्या नोटा पोलीस चालक भोसले यांनी त्यांचे हाताने माझे शर्टाचे उजव्या खिशात ठेवल्या. मला पोलीस निरीक्षक श्री. मयेकर साहेब यांनी सापळा कार्यवाही संदर्भात सुचना दिल्या तसेच श्री. राजपूत यांना पैसे दिल्या नंतर डावा हात डोक्यावरुन फिरवून सापळा पथकास इशारा देण्याबाबत सांगितले. दरम्यान पो.नि. मयेकर यांनी मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. सुर्यवंशी यांचे समवेत वरिष्ठ लिपीक श्री. राजपूत यांना भेटण्यासाठी ल विभाग–४, मरोळ सशस्त्र दल येथे पाठविले. आम्ही श्री. राजपूत वरिष्ठ लिपीक बसतात त्यांचे कार्यालयात गेलो. तेथे

23/01/18
(राजेश कृष्णा मयेकर)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई

जावून मी श्री. राजपूत याना भेटलो त्यावेळी माझे सोबत पंच श्री. सुर्यवंशी हे थोडया अंतरावर थांबले होते. मी श्री. राजपूत हे त्यांचे आसनावरुन उठून कार्यालयाचे बाहेर येत असल्याने मीही त्यांचे सोबत कार्यालयाचे बाहेर आलो कार्यालयाचे बाहेर आल्यानंतर मी श्री. राजपूत यांना म्हणालो की, कंम्पाऊडचे बाहेर असलेल्या चहाच्या टपरीवर चहा पिण्यास जावू. त्यावरून त्यांनी त्यांचेकडील मोटर सायकल चालू करुन मला बसण्यास सांगितले. त्यानुसार मी त्यांचे मोटर सायकलवर मागील शिटवर बसलो व ल विभाग–४ कंम्पाऊडचे बाहेर रस्त्याचे पलिकडे पंचवटी बिल्डींगचे लगत मरोळ मरोशी रोडवर असलेल्या चहाचे टपरीजवळ गाडी थांबविली. आम्ही दोघे तेथे उतरलो असता श्री. रजपूत यांनी तेथील चहावाल्या कडे दोन चहाची मागणी केली. दरम्यानचे काळात सापळा पथक व पंच चहा टपरीचे आजूबाजूला येऊन थांबले होते. चहावाल्याने चहा दिल्यानंतर आम्ही दोघांनी चहा पिला दरम्यान मी श्री. रजपूत यांचेशी सेवानिवृत्ती वेतनाचे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझेकडे पैशाची मागणी केली. श्री. रजपूत यांनी पैशाची मागणी केल्या नंतर मी माझे शर्टाचे उजव्या खिशात ठेवलेले रु. ७०००/– (रु. ५००/–दराच्या १४ भारतीय चलनी नोटा) उजव्या हाताने काढले व श्री. राजपूत यांचेकडे दिले. माझेकडून राजपुत यांनी लाचेचे पैसे स्विकारताच मला दिलेल्या सुचनेप्रमाणे केसावरुन डावा हात फिरवून श्री. राजपूत यांनी रक्कम स्विकारल्याचा इशारा सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना केला असता सापळा पथकातील अंमलदार यांनी श्री. राजपूत यांना ताब्यात घेतले.

आज दिनांक २३/०१/२०१८ रोजी श्री.दिलीप चंदनसिंग राजपूत, वरिष्ठ लिपीक, ल विभाग–४, मरोळ सशस्त्र पोलीस दल यांनी माझे सेवानिवृत्ती वेतन व इतर देय रक्कमांची देयके मंजुर करुन घेण्याकरीता माझेकडे पडताळणी दरम्यान रु. १०,०००/– लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम रु. १०,०००/–ऐवजी तडजोडीअंती सापळा कारवाई दरम्यान रु.७,०००/–लाचेची रक्कम स्विकारली असता सापळा पथकातील अंमलदार यांनी रंगेहाथ पकडले. म्हणून माझी श्री. रजपुत यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

23/01/18

( राजेश कृष्णा मयेकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई